speed post

जा.क्र. श्रीछशिम/२०२१-२२/१ee        दि. २५/३/२०२२

प्रति,
श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार
मु.पो. वांगदरी, ता. श्रीगोंदा,
जि. अहमदनगर.

**विषयः - माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागविलेल्या माहितीबाबत...**
**संदर्भः - आपला दि. १६.०३.२०२२ चा माहिती अधिकार अर्ज.**

उपरोक्त विषयान्वये आपण आमचे कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या अनुदानित व विना अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याबद्दलची दि. ०१.०१.२००५ ते १५.०३.२०२२ या कालावधीतील माहिती मागविलेली आहे. आपण मागविलेली माहिती महाविद्यालयात कार्यरत असणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची व्यक्तिगत स्वरूपाची माहिती असल्यामुळे सदरची माहिती आपणास देता येणार नाही. आपला माहिती अधिकार अर्ज दप्तरी दाखल करून घेतला आहे.

उपरोक्तबाबत नोंद घ्यावी.

जन माहिती अधिकारी
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर

प्रा. डी. के. नागवडे
24/3/22

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 INDIA दस रुपये TEN RUPEES

जोडपत्र अ

(नियम ३ पहा)

माहितीचा आधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळविण्यासाठीच्या अर्जाचा नमुना

प्रति,

राज्य जन माहिती आधिकारी — जन माहिती अधिकारी

(कार्यालयाचे नांव व पत्ता) — श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा
ता. श्रीगोंदा जि. अ.नगर पिन 413701

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : भाऊसाहेब भुजंगराव पवार

२. पत्ता : मु.पो. वांगदरी ता. श्रीगोंदा जि. अ.नगर पिन 413726
मो. ४४०५००१५१३

३. हव्या असलेल्या माहितीचा तपशील :

(एक) माहितीचा विषय — श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा यांच्या ज्युनिअर कॉलेज मधील कार्यरत असलेल्या अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बद्दलची सर्व माहितीची यादी मिळणेबाबत.

(दोन) ज्या कालावधी संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी — 1 जानेवारी 2005 ते 15 मार्च 2022

(तीन) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन

वरील विषयानुसार श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा येथे कार्यरत असलेल्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बद्दल माहिती, यादी मिळावी

(1) सर्वांचे उच्चतम शिक्षण काय आहे व त्यांचे उत्तीर्ण झालेले वर्ष.

(2) B.Ed, M.Ed उत्तीर्ण झालेले वर्ष.

(3) सर्वांची वैयक्तिक मान्यता (जिल्हापरिषद शिक्षण विभाग माध्यमिक) घेतलेले वर्ष.

वरीलप्रमाणे सर्वांची यादी मिळावी

प्रा. जी. के. नागवडे
कार्यवाही करावी
[signature]
१७/३/२२

(चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यक्तिशः हवी आहे — व्यक्तिशः

(प्रत्यक्ष टपालखर्च अतिरिक्त फी मध्ये समाविष्ट करण्यात येईल)

(पाच) टपालाद्वारे हवी असल्यास, —

(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

४. अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे — नाही

(असल्यास, त्याबाबतच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडावी)

ठिकाण : वांगदरी, श्रीगोंदा

दिनांक : 16 / 03 / 2022

B.B.Pawar

अर्जदाराची सही / अंगठा

जा.क्र.: छशिम/2021-22/923 दि. 29/03/2022

प्रति,

**मा. श्री. राजेंद्रजी (दादा) शिवाजीराव नागवडे**
**अध्यक्ष, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, श्रीगोंदा फॅक्टरी.**
**अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती, श्री छ.शि.म. श्रीगोंदा.**

**विषय:-** माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागविलेल्या माहितीबाबत...
**संदर्भ: -** श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार रा. वांगदरी, ता. श्रीगोंदा यांचा दि. १६.०३.२०२२ चा माहिती अधिकार अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये श्री भाऊसाहेब भुजंगराव पवार यांनी आपले कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या अनुदानित व विना अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याबद्दलची माहितीची यादी मागविलेली आहे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी त्यांची वैयक्तिक माहिती त्यांच्या परस्पर कोणालाही देण्यात येऊ नये अशा प्रकारचे अर्ज महाविद्यालयाकडे सादर केलेले असल्यामुळे सदरची माहिती संबंधितांना देता येणार नाही.

आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

**कळावे,**

आपला विश्वासू,

**सोबत: -** श्री पवार यांच्या माहिती अधिकार अर्जाची छायांकित प्रत

प्रभारी प्राचार्य
छत्रपती शिवाजी महाविद्यालय
श्रीगोंदा, जि. अहमदनगर

OK